‘मराठवाड्यातील व्यावसायिक पदवी महाविद्यालयीन पुस्तक पेढी योजनेची अंमलबजावणी आणि उपयुक्तता : एक अभ्यास’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतरविद्याशाखीय अंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

: संशोधक :

सरडे दिलीप निवृत्ती

ग्रंथपाल,

वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी.

ता. जि. उस्मानाबाद

: मार्गदर्शक :

डॉ. नामदेव किशनराव राठोड

ग्रंथपाल

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट.

ता. जळकोट जि. लातूर.

: संशोधन केंद्र :

माध्यम शास्त्र विभाग

स्वा.रा.ती.म. विद्यापीठ,

नांदेड.

जुलै २०२३

‘मराठवाड्यातील व्यावसायिक पदवी महाविद्यालयीन पुस्तक पेढी योजनेची अंमलबजावणी आणि उपयुक्तता : एक अभ्यास’

1) प्रस्तावना :

संशोधन ही ज्ञान प्राप्त करण्याची वैज्ञानिक पद्धती आहे. सर्व शास्त्राचा विस्तार आणि विकास करण्यासाठी संशोधन केले जाते. प्रत्येक शास्त्राच्या अभ्यास विषयानुसार त्यातील संशोधनाचे स्वरूप वेगवेगळे असते. त्यामुळे ग्रंथालयशास्त्र हे एक शास्त्र आहे या शास्त्रामध्ये ही आज संशोधन मोठ्या प्रमाणात होत आहे त्यामुळे आज ग्रंथालय शास्त्राचा विस्तार आणि विकास होत आहे.

ग्रंथालयाचा विकास हा त्या ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवेवर अधिक अवलंबून असतो. आज महाविद्यालयीन ग्रंथालयातून विविध सेवा दिल्या जातात त्यामध्ये ग्रंथ देवघेव सेवा, सार सेवा, संदर्भ सेवा, आंतरग्रंथालयीन आदान-प्रदान सेवा, इंटरनेट सेवा इत्यादी. या सेवाव्यतिरिक्त व्यावसायिक महाविद्यालयीन ग्रंथालयातून पुस्तक पेढी योजना या सुविधेअंतर्गत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी विनामुल्य वा मोफत ग्रंथ वाचनासाठी दिले जातात. ही एक अधिकची सेवा विध्यार्थ्यांना ग्रंथालयातून दिली जाते. ह्या सेवेने आज एक व्यापक रूप धारण केले असून ग्रंथालयाचा एक अविभाज्य घटक म्हणून या सेवेचा अभ्यास होणे ग्रंथालय शास्त्राच्या दृष्टीकोनातून महत्वाचे आहे. ही योजना भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार या दोन्हीच्या संयुक्त सहकार्याने राबविली जाते. त्यामुळे त्यांची अमलबजावणी आणि प्रत्यक्षात त्याचे उपयोजन उपभोक्त्यापर्यंत कशाप्रकारे केले जाते. हे अभ्यासण्याच्या उद्देशाने संशोधकाने *प्रस्तुत ‘मराठवाड्यातील व्यावसायिक पदवी महाविद्यालयीन पुस्तक पेढी योजनेची अंमलबजावणी आणि उपयुक्तता : एक अभ्यास’* ह्या संशोधन विषयाची निवड केली आहे.

या संशोधन विषयामध्ये मराठवाडा, व्यावसायिक शिक्षण, महाविद्यालयीन ग्रंथालये आणि पुस्तक पेढी योजना या शोधसंज्ञा आहेत त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

१.१) मराठवाडा :

मराठवाडा हे एक प्रादेशिक नाव असून महाराष्ट्र राज्याचा एक प्रशासकीय विभाग आहे. या विभागात छत्रपती संभाजी नगर, जालना, हिंगोली, नांदेड, बीड, परभणी, लातूर व धाराशीव या आठ जिल्हयांचा समावेश असून याचे क्षेत्रफळ ६४८११ चौरस कि.मी. इतके आहे. मराठवाड्याला

प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचा वारसा लाभला असून देशाच्या इतिहास व संस्कृतीच्या जडणघडणीत मराठवाड्याचा मोठा वाटा आहे. तसेच शैक्षणिक बाबतीत ही मराठवाड्यातील लातूर जिल्ह्याने देशामध्ये नाव निर्माण केले आहे. सोबतच छत्रपती संभाजी नगर आणि नांदेड जिल्ह्यामध्ये ही शिक्षणाच्या भरपूर सुविधा निर्माण झाल्या आहेत. अशा ह्या ऐतिहासिक जडणघडणीत आणि शैक्षणिक विकासात मराठवाडा प्रगतीपथावर आहे. याचाच भाग म्हणून या आठ जिल्ह्यामधून व्यावसायिक शिक्षण देणारी महाविद्यालये यांची संख्याही भरपूर आहे. त्यामुळे या व्यावसायिक पदवी महाविद्यालयीन ग्रंथालयाचा अभ्यास या संशोधन विषयामध्ये करायचा आहे.

१.२) व्यावसायिक शिक्षण :

व्यावसायिक शिक्षण म्हणजे काय हे पाहण्यापूर्वी व्यावसायिक याचा अर्थ जाणून घ्यावा लागेल. ज्या व्यक्तीकडे संबंधित विषय क्षेत्रातील ज्ञान आणि कौशल्य आहे व त्याला गगनमान्यता मिळाली आहे अशा व्यक्तीला व्यावसायिक म्हणतात. यावरून डॉ. चौबे यांनी त्यांच्या '*History of Indian Education*' या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, 'व्यावसायिक शिक्षणामध्ये व्होकेशन, शिक्षकांचे प्रशिक्षण, इंजिनिअरींग, तंत्रनिकेतन आणि वैद्यकीय शिक्षण याचा समावेश होतो असे शिक्षण ज्या महाविद्यालयातून दिले जाते त्यांना व्यावसायिक महाविद्यालये असे म्हणतात.'

१.३) महाविद्यालयीन ग्रंथालये :

डॉ.राजेंद्र कुंभार यांनी त्यांच्या, '*महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय ग्रंथालये*' या ग्रंथात महाविद्यालयीन ग्रंथालयाची व्याख्या केली आहे त्यांच्या मते, 'महाविद्यालयातील विद्यार्थी आणि अध्यापक यांना ग्रंथालय सेवा देण्यासाठी महाविद्यालयाने चालविलेले ग्रंथालय म्हणजेच महाविद्यालयीन ग्रंथालये होय.'

अशा प्रकारे महाविद्यालयीन ग्रंथालयाची व्याख्या पाहता यामध्ये पारंपारिक पदवी आणि पदव्युत्तर महाविद्यालये, व्यावसायिक महाविद्यालये यांचा समावेश होतो.

१.४) पुस्तक पेढी :

पुस्तक पेढी ही संकल्पना प्रथमतः विद्यापीठ अनुदान आयोगाने मांडली असून इ. स. १९६३-६४ मध्ये त्यांनी बुक बँक नावाच्या योजनेची घोषणा केली. या उपक्रमामागचा मूळ हेतू गरीब, होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना घरी अभ्यासासाठी दीर्घ मुदतीसाठी क्रमिक ग्रंथ उपलब्ध व्हावेत असा होता. परंतु पुढे ही योजना बंद करण्यात आली आहे. परंतु पुढे याच उद्देशाने

अनुसूचित जाती आणि जमाती संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी ही योजना चालू केली आहे ती आजतगायत चालू आहे. त्याचे स्वरूप आणि व्याप्ती थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

पुस्तक पेढी योजना ही केंद्र शासन पुरस्कृत आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्तपणे (५०:५०) १०० % अनुदानावर चालविली जाणारी एक योजना आहे. या योजनेअंतर्गत त्या - त्या जिल्ह्यातील शासनाने मान्यता दिलेल्या वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय, विधी आणि तंत्रनिकेतन महाविद्यालयातील अनुसूचित जाती आणि जमातीचे (SC/ST) विद्यार्थी जे भारत सरकार शिष्यवृत्तीधारक आहेत असे विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतात. या योजनेअंतर्गत या संवर्गातील विद्यार्थ्यांना क्रमिक ग्रंथाचा (Text Book) संच वर्षभरासाठी कोणतेही शुल्क न घेता अभ्यासासाठी दिला जातो.

2) विषयाची व्याप्ती आणि मर्यादा :

प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती ही मराठवाड्यातील व्यावसायिक शिक्षण देणारे महाविद्यालये आणि तेथे शिक्षण घेणारे अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गातील विद्यार्थी व तसेच महाराष्ट्र शासनाचा समाजकल्याण विभाग यांच्या पुरती मर्यादित आहे. प्रस्तुत विषयातील संशोधन हे सन २०१२-१३ ते २०२२-२३ या कालावधीपुरते मर्यादित आहे.

यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठांअतर्गत येणारे मराठवाड्यातील व्यावसायिक महाविद्यालयीन ग्रंथालयातील पुस्तक पेढी योजनेची अंमलबजावणी आणि त्यांची उपयुक्तता कशा प्रकारे राबविली जाते यांचा अभ्यास येथे करावयाचा आहे. मराठवाड्यात वैद्यकीय शिक्षण देणारे एकूण २७ महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र ४७, कृषी महाविद्यालये ७४, अभियांत्रिकी शिक्षण देणारे १२५, विधी महाविद्यालये १८ असे एकूण २९१ व्यावसायिक महाविद्यालये मराठवाड्यामध्ये आहेत.

मराठवाड्यातील खाजगी पदवी व्यावसायिक महाविद्यालयाची संख्या :

अ.क्र.	व्यावसायिक महाविद्यालये	एकूण संख्या
१.	वैद्यकीय महाविद्यालये	२७
२.	अभियांत्रिकी महाविद्यालये	१२५
३.	विधी महाविद्यालये	१८

४.	कृषी महाविद्यालये	७४
५.	औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये	४७
	एकूण महाविद्यालये	**२९१**

४) संशोधनाचे महत्व :

प्रस्तुत संशोधन विषयामध्ये खाजगी व्यावसायिक महाविद्यालयीन ग्रंथालयातून पुस्तक पेढी योजनेची अंमलबजावणी आणि उपयुक्तता कशी केली जाते याचा अभ्यास केला जाणार आहे. त्यामुळे या योजनेविषयी विस्तृत माहिती सर्व सामान्यांना व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना होणार आहे. जेणेकरून ह्या कोर्सला प्रवेश घेतल्यानंतर ते विद्यार्थी पुस्तक पेढी योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या ग्रंथाची मागणी महाविद्यालयीन ग्रंथपाल यांच्याकडे करू शकतात. त्यामुळे या विषयाला पालक आणि विद्यार्थी या दोघांच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्व आहे.

५) संशोधनाची उद्दिष्टे :

- व्यावसायिक महाविद्यालय ग्रंथालयातील वाचनसाहीत्य संग्रहाचा सर्वंकष आढावा घेणे.
- पुस्तक पेढी योजनेची अमलबजावणी व त्याचे उपयोजन याचा अभ्यास करणे.
- पुस्तक पेढी योजनेतील वाचनसाहित्य संग्रहाचा आढावा घेणे.
- पुस्तक पेढी योजनेचा लाभ उपभोक्त्यांना होतो किंवा नाही याची पहाणी करणे.

५) संशोधनाची गृहीतकृत्ये :

- पुस्तक पेढी योजनेअंतर्गत असलेला ग्रंथसंग्रह उपभोक्त्याच्या प्रमाणात पुरेपूर आहे.
- पुस्तक पेढी योजनेचा लाभ उपभोक्त्यांना सहज उपलब्ध करून दिला जातो.
- पुस्तक पेढी योजनेचा लाभ उपभोक्ते मोठ्या प्रमाणात घेतात.
- पुस्तक पेढी योजनेची अमलबजावणी व त्याचे उपयोजन योग्यरीत्या केले जाते.
- पुस्तक पेढी योजना मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी उपयुक्त आहे.

६) संशोधन पद्धती, तंत्रे आणि साधने :

संशोधनाच्या मुख्यत्वे तीन पद्धती आहेत. यामध्ये वर्णनात्मक संशोधन पद्धती, ऐतिहासिक संशोधन पद्धती आणि प्रायोगिक संशोधन पद्धती यांचा समावेश होतो. या संशोधन

पद्धती पैकी प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करावयाचा असून त्यासाठी पाहणी व निरीक्षण ह्या तंत्राचा वापर करावयाचा असून माहिती संकलन करण्यासाठी प्रश्नावली आणि मुलाखत या साधनाचा वापर करण्यात येणार आहे.

६.१) संशोधन पद्धती व्याख्या :

१) डॉ. वा. भा. पाटील :

यांनी त्यांच्या *संशोधन पद्धती* या ग्रंथामध्ये जे डब्ल्यू वेस्ट यांची व्याख्या सांगितली आहे. त्यांच्या मते, 'संशोधन म्हणजे वैज्ञानिक पद्धती प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याची सुव्यवस्थित व नियमबद्ध अभ्यासण्याची प्रक्रिया होय.'

२) डॉ. बोधनकर सुधीर :

यांच्या मते, 'सामाजिक घटना, समस्या, व्यवहार इत्यादीतील अचूक कार्य-कारण संबध शोधून काढण्यासाठी आणि संबधित विषयाचे प्रचलित ज्ञान अद्ययावत करण्यासाठी केलेल्या पद्धतशीर अध्ययनाला सामाजिक संशोधन असे म्हणतात'.

६.२) वर्णनात्मक पद्धती :

डॉ. रिसवडकर म. रा. यांनी त्यांच्या, *संशोधन : व्याख्या आणि पद्धती* या ग्रंथात वर्णनात्मक संशोधनाची व्याख्या अशी सांगितली आहे. त्यांच्या माटे, 'कोणत्याही घटनेच्या समाजाच्या सामाजिक संस्थेच्या किंवा एखाद्या उपक्रमाच्या सद्यस्थितीचा सर्वंकष अभ्यास करून प्रगतीचा आढावा घेण्यात येतो व विश्लेषणात्मक वर्णन करण्यात येते आशा सर्व संशोधनास वर्णनात्मक संशोधन म्हणतात.'

७) प्रकरणाची रूपरेषा :

१) प्रस्तावना
२) संशोधन पद्धती
३) संशोधन पूर्व वाचानसाहीत्याचा आढावा
४) व्यावसायिक पदवी महाविद्यालयीन पुस्तक पेढी योजना
५) संकलित माहितीचे विश्लेषण आणि पृथकरण
६) निष्कर्ष आणि शिफारशी

८) संशोधन कार्याचे नियोजन :

अ. क्र.	कार्याचा तपशील	कालावधी
१	संदर्भ साहित्य संकलन आणि वाचन	जुलै ते डिसेंबर २०२३
२	प्रस्तावना, प्रश्नावली वाटप करणे आणि माहिती भरून परत घेणे.	जानेवारी ते जून २०२४
३	माहिती विश्लेषण करणे	जुलै ते डिसेंबर २०२४
४	निष्कर्ष आणि शिफारशी मांडणे व संशोधनाचा अंतिम गोषवारा दाखल करणे	जानेवारी ते जून २०२५

संदर्भ सूची :

१) कठारे, अनिल,(२०१३). मराठवाड्याचा इतिहास. औरंगाबाद:एज्युकेशनल पब्लिकेशन्स.

२) बोधनकर, सुधीर, अलोणी विवेक. आणि कुळकर्णी, मृणाल, (२०१८). सामाजिक संशोधन पद्धती. नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन.

३) कुंभार, राजेंद्र, (२०००). महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये. नाशिक: य. च. म. मु. विद्यापीठ.

४) कुंभार, राजेंद्र, (२०००). महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये. नाशिक: य. च. म. मु. विद्यापीठ.

५) पाटील, वा. भा., (२०१०). संशोधन पद्धती. जळगाव: प्रशांत प्रकाशन.

६) रिसवडकर, म. रा.,(२०००). संशोधन : व्याख्या आणि पद्धती. नाशिक: य. च. म. मु. विद्यापीठ.

७) महाराष्ट्र शासन आदेश क्र. शिक्षण / भासशि ३ /पुस्तक पेढी ९४-९५ /दि. २४/०८/१९९४

८) डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद, ५८ वा वार्षिक अहवाल , पृ. ९०

९) Chaube, S. P.,2005, History of Indian Education, Agra : VinodPustakMandir, PP. 117

१०) http://muhs.ac.in date : 06/12/2020

११) www.vnmkvp.ac.in date : 06/10/2021

१२) http//mr.vikaspedia.in